करमाळा तालुक्याचे लोकप्रिय मुखपत्र...

साप्ताहिक
कमलाभवानी

# संदेश

वर्षे 34 वे

| www.saptahiksandesh.com |

संस्थापक संपादक
डॉ.ॲड.बाबूराव हिरडे
संपादक
सौ.उषादेवी बाबूराव हिरडे
वेताळ पेठ, करमाळा, जि.सोलापूर
मो.९४२३३३७४८०

रजि नं.७०४९७/९८ (दिल्ली) | पोस्ट परवाना PPR/01/2021-2023 | वर्षे ३४ वे | अंक क्र.१२ | पाने-१२ | दि.१७/०१/२०२५ | दर शुक्रवारी प्रसिध्द | किंमत - ४ रू.



Shweta
Gift & Toys
श्वेता गिफ्ट
ॲन्ड टाईज
लहान मुला-मुलींसाठी थार(जीप)
4 X 4 येथे उपलब्ध !
श्रीराम मंदिर शेजारी, वेताळपेठ, करमाळा. (9822058106 )

हॉटेल
राजयोग
बायपास रोड, करमाळा., जि.सोलापूर.
व्हेज
• शुध्द शाकाहारी
• चायनीज



लॉन्स
मुंज, वाढदिवस, डोहाळे जेवण, साखरपुडा,
नामकरण सोहळा, गेट-टूगेदर, कंपनी पार्टीसाठी
सर्व सुविधा उपलब्ध..!
प्रोप्रा : राजेंद्र मोरे (मो.9503175444)

# कुगाव मध्ये वाढली धडधड - कुगाव ते शिरसोडी पुलाचे काम गतिमान

करमाळा : कुगाव येथे वाहनांची धडधड व कामगारांची धडपड जोरदार सुरू झाली आहे. कुगाव ते शिरसोडी पुलाचे काम दोन्ही बाजुंनी सुरू झाले आहे. हे काम गतिमान झाल्याने उजनी परिसरातील नागरीकात उत्साहाचे वातावरण आहे.

चिखलठाण, दहिगाव, शेटफळ, पोफळज, केडगाव, पूर्व सोगाव आदी गावांना इंदापूर तालुक्यात जाण्यासाठी टेंभूर्णी मार्गे वळसा घालून जावे लागत होते. यासाठी ७० ते ८० किलोमीटर अंतर कापावे लागत होते. आता कुगाव ते शिरसोडी हा पुल झाल्यास हेच अंतर अवघे ५ ते १५ कि.मी. होत असल्याने उजनी पुनर्वसन भागातील नागरीकात





उत्साहाचे वातावरण आहे. विधानसभा निवडणुकीपूर्वी कुगाव ते शिरसोडी पुलाच्या कामाची घोषणा झाली होती. एवढेच नाहीतर पुलाच्या भुमीपूजनाचा शुभारंभ उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे हस्ते झाला होता. विधानसभा निवडणुकीनंतर हे काम गतीमान झाले असून, कुगाव व शिरसोडी या दोन्ही बाजुने हे काम सुरू आहे.मोठमोठी वाहने व जड यंत्रसामुग्री तसेच पुलाचे साहित्य हे कुगाव मध्ये येत असल्याने वाहनांची धडधड सुरू झाली आहे.



उजनी पुनर्वसित गावांचा प्रवास हा धोकादायक होता. उजनीतून लॉन्च मधून प्रवास करणे म्हणजे मरण मुठीत घेऊन जाण्यासारखे होते. आत्तापर्यंत जवळपास ४० लोकांना जलसमाधी मिळाली आहे. या पार्श्वभुमीवर हा पुल व्हावा; यासाठी मी सरपंच असताना तत्कालीन पालकमंत्री दत्तात्रय भरणे यांचेकडे प्रयत्न केला होता. त्याला यशही आले. उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या निर्णयाने हा पुल सुरू झाला असून हे काम गतिमान झाले आहे. ९०० दिवसात हे काम पूर्ण करण्याच्या सूचना शासनाने दिल्या आहेत. हा पुल झाल्यास करमाळा आणि इंदापूर तालुक्यातील नागरीकांची सोय होणार आहे.

**...तेजस्वीनी कोकरे (माजी सरपंच, कुगाव)**

सस्नेह निमंत्रण









नामरत्न फेस्टिवल
कै.नामदेवरावजी जगताप साहेब
यांच्या जयंतीनिमित्त समाजप्रबोधनकार
ह.भ.प.निवृत्ती महाराज देशमुख (इंदुरीकर)
यांचे हरिकिर्तन
रविवार, दि.१९ जानेवारी २०२५ रोजी दुपारी३ वा. ३० मि.
तरी हेच निमंत्रण समजून सर्व भाविक भक्तांनी
किर्तनाचा लाभ घ्यावा; ही नम्र विनंती !
समस्त भजनी मंडळ...
वीट, देवळाली, खडकेवाडी, पिंपळवाडी, मोरवड
विहाळ, हिवरवाडी, करंजे, हिसरे, हिवरे, फिसरे
सौंदे, कोळगाव, निमगाव, शेलगाव, अर्जुननगर
मिरगव्हाण, म्हसेवाडी



स्थळ
यशवंतराव चव्हाण
महाविद्यालयाच्या पाठी माणील मैदान
करमाळा., जि.सोलापूर
निमंत्रक : यशवंतराव चव्हाण फाऊंडेशन, करमाळा.

गावाच्या विकासासाठी विशेष नियोजन केलेतरच प्रगती होणार आहे.

संपादकीय.....................................!

# स्मार्ट सीटी..!

सन २०१५ मध्ये देशभर 'स्मार्ट सीटी' हा विषय गाजत होता, त्यानंतर 'स्मार्ट व्हीलेज' हा विषय गाजू लागला. शासनाचे धोरण चांगले होते. शहरं आणि गावं अधीक सुंदर व्हावीत, स्वच्छ व्हावीत, हिरवीगार व्हावीत हा त्यामागचा उद्देश होता. उद्देशाबाबत दुमत असण्याचे कारण नाही. पण गेल्या दहा वर्षात स्मार्ट सीटी आणि स्मार्ट व्हीलेज ही संकल्पना फक्त वृत्तपत्रातील रखाणे भरण्यापुरतीच राबवली. काही मंत्र्यांना, काही खासदारांना, काही आमदारांना गावे व शहरे दत्तक दिली; पण कोठेतरी दखल घेण्याजोगे झाले असे काही नाही. निदान करमाळा तालुक्यातील तरी गावे अथवा करमाळा शहर स्मार्ट झाले नाही. करमाळा शहर हे म्हणायला शहर आहे, तसे ते अर्धवट खेडे आणि अर्धवट शहर आहे. शहर हे बकाल झाले आहे. उजनी ११० टक्के भरल्यानंतरही शहरात तीन-तीन दिवस पाणी मिळत नाही. शहरातील रस्ते म्हणजे मातीचे ढिगारे झाले आहेत. एक वाहन गेले की घरभर धुराळा उडतो. गटारीची दुरावस्था आहे, शहराचे देखणेपण हरवले आहे. करमाळा शहरासाठी कार्यरत असलेली नगरपालिका ही १५८ वर्षाची जिल्ह्यातील जुनी नगरपालिका आहे. अशा जुन्या पालिकेची स्थिती म्हाताऱ्या व्यक्तीसारखी झाली आहे. खरंतर वय वाढल्यानंतर प्रगल्भता येणे अवश्यक असताना येथे अद्यापही पोरकटपणा दिसतो आहे. खरंतर हे शहर दत्तक घेऊन येथे सर्व प्रकारच्या सुविधा देवून 'स्मार्ट सीटी' करणे आवश्यक आहे.

शहराचीच दुरावस्था असेलतर खेड्यांचे काय असणार आहे. वास्तविक पाहाता शहर आणि खेडी यात अजुनही खुप मोठे अंतर आहे. खेडी वर्षानुवर्षे अविकसीत राहिली आहेत आणि शहरात निदान प्राथमिक गरजा तरी दिल्या जातात, त्यामध्ये वीज, पाणी, रस्ते, गटारी, स्वच्छतागृहे सर्व काही देण्याचा प्रयत्न असतो. या उलट खेड्यात प्यायला पाणी नाही. पाणी असलेतर ते शुध्द मिळेलच याची शाश्वती नाही.विशेष म्हणजे खेड्यात जालशुध्दीकरण केंद्र हे काय आहे. हेच माहित नाही. गावा-गावात वीजेचा तर भरवसाच नसतो. खरंतर वीज, रस्त्यावरील दिवे, रस्ता आणि गटारी या खेड्यात चैन भासू लागल्या आहेत. त्यानुसारच त्याची उपब्धता दिसून येते. शौचालये गावात आणि रहिवास शेतात अशी स्थिती खेड्यांची आहे. पुर्वी हागणदारीमुक्त झालेल्या गावाचा आढावा घेतलातर दिसते की, गावात शौचालय बांधलेले आहे पण सोयीसाठी शेतकरी शेतात रहातोय. सोयीनुसार वस्त्या मोठ्या झाल्या आहेत. त्या वस्त्यांना ना पाणी, ना गटारी, ना रस्ता, ना शाळा सर्वच काही अजब काम आहे. काम जिकीरीचे आहे त्यामुळे शासन किंवा ग्रामपंचायत काही करत नाहीत.

तालुक्यात सध्या १०८ ग्रामपंचायती अस्तित्वात आहेत. त्याला पुरेसे ग्रामसेवक नाहीत. सध्या जवळपास ८० ग्रामसेवक असून त्यांच्यावर संपुर्ण तालुक्याचा कार्यभार चालवला जातो.याशिवाय ग्रामपंचायतीचा कारभारही मोठा गमंतशीर आहे. वांगीच्या चार वांगी आहेत. वांगी नं.१, वांगी नं.२ यांचा उजनीच्या पाण्याने कोठेच मेळ लागत नाही. पुर्वी या सर्व गावांसाठी एकच ग्रामपंचायत होती. अलीकडे ग्रामपंचायतीचे विभाजन झाले आहे. याशिवाय खातगाव नं.१, खातगाव नं.२ व खातगाव नं.३ ही तिन्ही गावे वेगवेगळ्या ठिकाणी आहेत. साधारणत: ५०० मतदान असलेल्या गावाला स्वतंत्र ग्रामपंचायत देण्याचे शासनाचे धोरण आहे. त्यानुसार आळसुंदे, हिवरवाडी, भिवरवाडी, ढोकरी, गोयेगाव, जेऊरवाडी, रामवाडी, रिटेवाडी, रोशेवाडी, तरटगाव अशा छोट्या गावांना स्वतंत्र ग्रामपंचायती आहेत. पण पोथरे-निलज, म्हसेवाडी-अर्जुननजर, देवळाली-खडकेवाडी, सोगाव (पुर्व) - सोगाव (प.), वडगाव (द.)-वडगाव(उ.), विहाळ-नाळेवस्ती, कोर्टी-कुस्करवाडी-गोरेवाडी-हुलगेवाडी, रावगाव-शेळकेवस्ती-वाघमारेवस्ती-धकटवस्ती, करंजे-भालेवाडी, कुंभारगाव-घरतवाडी, केत्तूर नं.१-केत्तूर नं.२, वंजारवाडी-कुरणवस्ती, चिखलठाण नं.१-चिखलठाणनं.२, सांगवी नं.१-सांगवी नं.२,गुलमरवाडी-भगतवाडी, लिंबेवाडी-राखवाडी अशा ग्रुप ग्रामपंचायती आहेत. यामध्ये दोन तोटे आहेत. एक म्हणजे जे गाव मोठे असते त्यांचे सदस्य जास्त असतात. ते छोट्या गावाच्या सदस्याकडे व गावाकडे लक्ष देत नाहीत. जोडलेल्या गावाच्या विकासासाठी मोठे गाव प्रयत्न करत नाहीत. त्यामुळे वर्षानुवर्षे छोटी गावे अन्याय सहन करत आलेली आहेत. तसेच सोगाव पुर्व व पश्चिम यांचा भौगोलीकदृष्ट्या कोठेच मेळ लागत नाही. तीच स्थिती वडगाव दक्षिण व वडगाव उत्तरची, सांगवी नं.१ व २ यांची आहे. यातील छोट्या गावांवर वर्षानुवर्षे अन्याय झालेला आहे व छोटी गावे हे सहन करत आहेत. बिटरगाव येथील पाटीलवस्ती ही वांगीत घुसडली आहे. त्यांचा ना गावाशी संपर्क ना ग्रामपंचायतीशी संपर्क. आणखी एक बाब म्हणजे एक ग्रामसेवक अशा विस्कळीत गावात कशी कामे करणार ? ग्रामपंचायत एकच पण गावा-गावातील अंतर चार ते दहा किलोमीटर लांब असेलतर ग्रामसेवक कसे जाणार आणि लोक ग्रामसेवकाला कसे भेटणार ? तिथे शासकीय योजना कशा राबवल्या जाणार ? सर्वांना समान न्याय कसा देणार..? पिण्याचे पाणी, रस्ते, दिवे, गटारी मिळणारे अनुदान आणि गावांचा मोठा पसारा त्यामुळे कामाचा मेळच लागत नाही. शासनाच्या योजनासुध्दा या गावात पोहोचू दिल्या जात नाहीत तसेच आधिकारीही छोट्या गावात जात नाहीत. त्यामुळे खेडी स्वयंपुर्ण झाली पाहिजे असे म्हटले,जाते पण प्रत्यक्ष तसे वातावरण नसेल तर खेडी कशी स्वयंपुर्ण कशी होतील..?

खेड्यातले प्रश्न वेगवेगळे आहेत. उजनी भागात दोन गावांना जोडण्यासाठी लॉंच सेवेची गरज आहे. गावा-गावांना जोडणारे रस्त्याची अवश्यकता आहेत.जलशुध्दीकरण केंद्रातून पाणी पुरवठा केला पाहिजे, गावासांठी झालेली सिंगलफेज वीज, वाड्यावस्त्यावर २४ तास दिली पाहिजे. याशिवाय सध्या तालुक्यात गावागावात शेतात जाणारे रस्ते आणि आडवलेल्या पाईपलाईन याचे वाद उफाळून आलेले आहेत. याकडे लोकप्रतिनिधी व अधिकाऱ्यांनी लक्ष देण्याची गरज आहे. यावर्षी पाऊस जरा बरा आहे.त्यामुळे बहुतांशी विहीरी,नालाबंडीग, तलाव यात पाणी साठलेले आहे. त्यामुळे पिण्याच्या पाण्याचा मोठा प्रश्न नाही. पण या स्थितीत 'स्मार्ट व्हिलेज' ही संकल्पना कशी राबवणार..? वाड्या वस्त्यांना सुविधाच नाहीत. त्यासुविधा देण्यासाठी योग्य नियोजनाची गरज आहे. वास्तविक पाहता कृषीप्रधान देश म्हणून सांगताना शेतकऱ्यांनाच सुविधा दिल्या जात नाहीत, म्हणून आपली प्रगती नाही. प्रत्येक शेतकऱ्यांच्या शेतात वाहन पोहचेल असा रस्ता शासनाने दिल्यास दूध व्यवसाय, कुकटपालन, शेळी-मेंढीपालन, भाजीपाला, रेशीम उत्पादन ,घोंगडी उत्पादन हे व्यवसाय जोरात सुरू होतील व शेतकरी सक्षम उभा राहिल.

'स्मार्ट सीटी'ला ज्या सुविधा द्यायच्या त्या द्या पण खेड्यातही माणसं राहतात याची आठवण ठेवून त्यांच्या बरोबर 'स्मार्ट व्हीलेज' हे अभियान शासनाने पुर्णपणे राबवले पाहिजे. केवळ गावे दत्तक देवून हे प्रश्न सुटणार नाहीत. त्यामुळे सध्यातरी स्मार्ट सीटी, स्मार्ट व्हिलेज कुठय..? हाच प्रश्न करमाळा तालुकावासिया समोर आहे.

सा.कमलाभवानी संदेश हे साप्ताहिक प्रकाशक, मालक, मुद्रक सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी संदेश प्रिंटर्स, वेताळपेठ, करमाळा येथे संपादक म्हणून सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी छापून तेथेच प्रसिध्द केले. (या अंकातील मजुकराशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

# १९ जानेवारीला निवृत्ती महाराज देशमुख (इंदुरीकर) यांचे किर्तन



करमाळा(सं.प्र.) : देशभक्त कै.नामदेवरावजी जगताप यांच्या जयंतीनिमित्त यशवंतराव चव्हाण फाउंडेशनच्या वतीने आयोजित नामरत्न फेस्टीवल अंतर्गत समाजप्रबोधनकार ह.भ.प.निवृत्ती महाराज देशमुख (इंदुरीकर) यांचा किर्तनाचा कार्यक्रम १९ जानेवारीला दुपारी ३ वा. ३० मि. आयोजित करण्यात आला आहे. हा कार्यक्रम यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाच्या पाठीमागील मैदान, करमाळा येथे होणार आहे. यावेळी वीट, देवळाली, खडकेवाडी, पिंपळवाडी, मोरवड, विहाळ, हिवरवाडी, करंजे, हिसरे, हिवरे, फिसरे, कोळगाव, निमगाव, शेलगाव, सौंदे, अर्जुननगर, मिरगव्हाण, म्हसेवाडी इ. गावातील भजनी मंडळ उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाचा लाभ भाविक भक्तांनी घ्यावा; असे आवाहन आयोजकांनी केले.

आरामदायक व सुखकर प्रवासासाठी एकच नांव...



**जय बजरंगबली टूर्स & ट्रॅव्हल्स्** पोंधवडी, ता.करमाळा.

- **वैष्णोदेवी, काश्मिर, अमृतसर दर्शन**
  माता वैष्णोदेवी, श्रीनगर, गुलमर्ग, सोनमर्ग, पेहलगाम, अमृतसर इ.
  कालावधी : दि.२८/२/२०२५ ते १३/३/२०२५
  सहल खर्च रू.२६,०००
- **नेपाळ दर्शन** (रेल्वे प्रवास ३ एसी)
  काशी, आयोध्या, प्रयागसह..
  कालावधी : दि.२२/३/२०२५ ते ४/४/२०२५
  सहल खर्च रू.२७,५००
- **गंगासागर दर्शन**
  गंगासागर, कोलकत्ता, जगन्नाथ पुरी भुवनेश्वर, कोणार्क, साक्षी गोपाळ
  कालावधी : दि.१७/४/२०२५ ते २५/४/२०२५
  सहल खर्च : रू.१२,८००
- **गुजरात दर्शन**
  गिरनार पर्वत, जुनागड, सोरटी सोमनाथ पोरबंदर, द्वारका, गिर अभयारण्य
  कालावधी : दि.२९/४/२०२५ ते ६/५/२०२५
  सहल खर्च : रू.११,०००
- **कन्याकुमारी दर्शन**
  कन्याकुमारी, त्रिवेंद्रम, मदुराई, रामेश्वरम्, तिरूपती बालाजी
  कालावधी : दि.२६/५/२०२५ ते ४/६/२०२५
  सहल खर्च : रू.१३,८००
- **चारधाम दर्शन**
  कालावधी : दि.१०/६/२०२५ ते २५/६/२०२५
  सहल खर्च : रू.३५,०००

• रेल्वे प्रवास • बस प्रवास
• भोजन व्यवस्था • राहण्याची उत्तम सोय



**बुकींग सुरू**

संपर्क श्री.मयुर राऊत
मो.८८८८३३३६३८ / ८६९८३३३६३८

**डॉ.शेलार हॉस्पिटल**

नवीन प्रशस्त जागेत नवीन रूपात...
दि.२६ जानेवारी पासून
**स्थलांतर**



नवीन पत्ता : ICICI बँकेच्या पाठीमागे, श्रावणनगर, करमाळा.
टीप : हॉस्पीटल कामासाठी स्टाफ पाहिजे. गरजूंनी संपर्क करावा..!
संपर्क : डॉ.शेलार (9922957895)

# राष्ट्रीय सरपंच संसदेच्या जिल्हा महिला संघटक पदी डॉ.विद्या दुरंदे



करमाळा(सं.प्र.) : राष्ट्रीय सरपंच संसदेच्या सोलापूर जिल्हा संघटक पदी राजुरी येथील डॉ.विद्या दुरंदे, करमाळा तालुका अध्यक्ष पदी रविंद्र वळेकर, तालुका संघटक पदी महेश गणगे, तालुका समन्वयक पदी मनोहर कोडलिंगे, महिला तालुका अध्यक्ष पदी धनश्री गलांडे व महिला तालुका समन्वयक पदी सोनाली भोसले यांची निवड करण्यात आली आहे.

बार्शी येथे राष्ट्रीय सरपंच संसदेची जिल्हा व तालुका कार्यकारिणी निवडीची बैठक पार पडली. त्यावेळी वरील पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली.

एमआयटी पुणे शिक्षण संस्था समुहाचे कार्यकारी अध्यक्ष व एमआयटी स्कुल ऑफ गव्हर्नमेंटचे प्रणेते राहुल कराड यांचे संकल्पनेतून भारतीय छात्र संसद, राष्ट्रीय महिला परिषद, राष्ट्रीय शिक्षक काँग्रेस आणि राष्ट्रीय सरपंच संसदेची स्थापना करण्यात आली आहे. देशाच्या शाश्वत व सर्वांगीण ग्रामविकास प्रक्रियेत पंचायतराज व्यवस्थेतील लोकनियुक्त लोकप्रतिनिधींची भुमिका मध्यवर्ती व सर्वात महत्वाची आहे. देशाच्या पंचायतराज व्यवस्थेतील सर्व लोकप्रतिनिधींचे अराजकीय स्वरूपात सुसंघटन करणे, त्यांचे सर्वांगीण प्रबोधन करणे व विविध उपक्रमांचे अभ्यासपूर्वक संयोजन करून त्यांना प्रत्यक्ष ग्रामविकास प्रक्रियेत मौलिक सहकार्य करणे हे राष्ट्रीय सरपंच संसदेचे प्रमुख उद्दीष्ट आहे. हेच उद्दीष्ट डोळ्यासमोर ठेवत सामाजिक क्षेत्रात भरीव योगदान देणाऱ्यांची या संसदेवर निवड करण्यात आली आहे; अशी माहिती राष्ट्रीय सरपंच संसदचे प्रांताध्यक्ष ॲड.विकास जाधव व प्रमुख समन्वयक योगेश पाटील यांनी दिली.

या निवडीप्रसंगी जिल्ह्यातील सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, पदाधिकारी आणि मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**प्रियंका आय केअर हॉस्पीटल**



पुणे रोड, त्रिमुर्ती कुशनचा वरचा मजला, करमाळा. मो.9423222266, 9604762600

उपलब्ध सुविधा... **डोळ्यांच्या आजारावरील निदान व उपचार केंद्र**

- मोतीबिंदू, काचबिंदू, नासूर, तिरळेपणा, दृष्टिदोष वरील निदान व उपचार
- जपानच्या अत्याधुनिक मशीनव्दारे शास्त्रोक्त पध्दतीने तपासणी व उपचार
- फॅकोइमलसीफिकेशनी बिनटाक्याची मोतीबिंदू वरील शस्त्रक्रिया.
- सुसज्ज ऑपरेशन थिएटर • नेत्रपटल आजाराचे निदान व उपचार
- लेसर मशीनव्दारे लेन्स वरील जाळी काढण्याची सोय
- एस्कॅन बायोनेट्री आणि केरॉटोमॅट्री

**डॉ.डी.बी.केमकर**
(M.S.DOMS) नेत्ररोग तज्ञ
कन्सल्टिंग ऑफ्थॅलमोलॉजीस्ट व ऑफ्थॅलमिक सर्जन

अत्याधुनिक प्रकारची लेझर सुविधा उपलब्ध ! (Nd YAG LASER) रविवारी बंद
वेळ : सकाळी १० ते ६ (सोमवार ते शनिवार)

**आदिका मेडिकल**, पुणे रोड, करमाळा., जि.सोलापूर

# कमलादेवी मंदिराच्या कामास ठोंबरे यांचेकडून २१०० रू. देणगी



करमाळा(सं.प्र.): श्रीदेवीचामाळ येथील श्री जगदंबा कमलादेवी मंदिर ट्रस्टच्या वतीने मंदिर जतन व संवर्धनच्या कामास गेल्या एक वर्षापासून सुरूवात करण्यात आली आहे. सदरचे काम प्रगतीपथावर असून ट्रस्ट चे अध्यक्ष सोमनाथ चिवटे, सचिव अनिल पाटील व सर्व विश्वस्त यांनी मदतीचे आवाहन भक्तांकडे केले होते. या आवाहनास प्रतिसाद म्हणून करमाळा येथील मयुरेश लक्ष्मीकांत ठोंबरे याच्या वाढदिवसानिमित्त लक्ष्मीकांत ठोंबरे यांचेकडून २१०० रूपयाची देणगी प्राप्त झाली आहे. यानिमित्त त्यांचा सत्कार ट्रस्टकडून महादेव भोसले, व्यवस्थापक अशोक गाठे यांनी केला. या निमित्ताने श्री कमलाभवानी मंदिर जीर्णोध्दाराच्या कामासाठी भाविकांनी सढळ हाताने मदत करण्याचे आवाहन मंदिर समितीने केले आहे.

# दत्तकला इंटरनॅशनल स्कुल अॅन्ड कॉलेज मध्ये वार्षिक क्रिडा महोत्सव साजरा



करमाळा(सं.प्र.) : दत्तकला इंटरनॅशनल स्कुल अॅन्ड ज्युनियर कॉलेज मध्ये वार्षिक क्रिडा महोत्सव साजरा करण्यात आला.

मानवी जीवनात खेळाचे अनन्यसाधारण महत्व आहे. मुलांच्या शारिरीक वाढीबरोबरच त्यांचे मानसिक आरोग्य चांगले रहावे तसेच विद्यार्थ्यांमध्ये संघ भावना, आत्मविश्वास, खिलाडूवृत्ती इ. गुण विकसित करण्याच्या दृष्टीने खेळ महत्वाची भुमिका बजावतो. हाच उद्देश ठेवून सालाबादप्रमाणे यावर्षी देखील क्रिडा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असल्याचे दत्तकला संस्थेचे अध्यक्ष प्रा.रामदास झोळ यांनी सांगितले. यावेळी सचिव माया झोळ यांनी मुलांनी मोबाईलच्या आभासी खेळापासून दूर राहून मैदानी खेळ खेळावेत आणि आपला सर्वांगीण विकास साधावा; असा संदेश दिला. यावेळी उपाध्यक्ष राणादादा सुर्यवंशी, प्रशासकीय अधिकारी प्रा.डॉ.विशाल बाबर, दत्तकला ग्रुप ऑफ स्कुलच्या डायरेक्टर आणि सीबीएसई च्या प्राचार्या डॉ.नंदा ताटे, एसएससी विभाग आणि ज्युनियर कॉलेजच्या प्राचार्य सिंधू यादव, सर्व शिक्षक उपस्थित होते. प्रास्ताविक प्रा.ज्योती झोरे यांनी केले.

# निंभोरे येथे राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती साजरी

करमाळा (सं.प्र.) : निंभोरे येथील ग्रामपंचायत कार्यालयात राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी करण्यात आली. लोकनियुक्त सरपंच रविंद्र वळेकर यांचे उपस्थितीत भाऊराव वाघमारे यांचे हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले. उपस्थित सर्व ज्येष्ठ नागरीकांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. यावेळी उपसरपंच प्रतिनिधी संतोष पाटील, ग्रामपंचायत सदस्य विकास वळेकर, दिपक गवळी, आण्णा सावंत, पोलीस पाटील केरबा पन्हाळकर, आर.व्ही. ग्रुपचे अध्यक्ष ईश्वर मस्के, पोपटराव वाघमारे, सौदागर वाघमारे, दत्ताभाऊ वळेकर, मधुकर तनपुरे, शंकर मस्के, राजू माळी, राजाभाऊ वळेकर, बापू वळेकर, छगन वाघमारे, ज्ञानेश्वर वळेकर, तात्या सातव, जालिंदर काकडे, कर्मचारी दिलीप मुळे, सुरेश गायकवाड व ग्रामस्थ उपस्थित होते.

समर्थ बालरूग्णालय
स्त्रीरोग व प्रसुतीगृह
फक्त महिलांसाठी व गरोदर स्त्रीयांसाठी
मोफत आरोग्य तपासणी शिबीर
दि.२० ते २५ जानेवारी २०२५ पर्यंत ● वेळ : सकाळी १० ते सायं ६ पर्यंत
● उपलब्ध सुविधा व शिबीराचे वैशिष्टे ●
❊ प्रसूतीपुर्व व प्रसुती दरम्यानचे उपचार
❊ जोखमीची गर्भवस्था व उपचार
❊ वंध्यत्व निवारण सल्ला व उपचार
❊ मासिक माळी समस्यांवरील उपचार
❊ स्त्रीरोग विषयक सर्व उपचार
● सवलतीच्या दरात सोनोग्राफी ३०० रू. फक्त
● रक्त तपासणीवर ३० टक्के सुट
● सवलतीच्या दरात डिलेव्हरीसाठी (नॉर्मल व सिझेरियन) नावनोंदणी
● बाळंतपणासाठी २० किमी.पर्यंत अॅम्ब्युलन्स सेवा मोफत
तरी जास्तीत जास्त महिलांनी या शिबीराचा लाभ घ्यावा !
डॉ.वृषाली अभिजित हंकारे
स्त्रीरोग व प्रसुतीतज्ञ (M.B.B.S. D.G.O)
डॉ.उदयसिंह नामदेव गायकवाड
बालरोग तज्ञ (M.B.B.S. D.C.H)
शिबीराचे स्थळ : गायकवाड चौक, करमाळा (02182-220057, 9146430550)

## महाराष्ट्र बटालियनचे कमांडिंग ऑफिसर

# रणधीर सतीश यांची चव्हाण महाविद्यालयास भेट



करमाळा (सं.प्र.): विद्या विकास मंडळ संचलित यशवंतराव चव्हाण महाविद्यालयातील एनसीसी विभागास ९ महाराष्ट्र बटालियन एनसीसी सोलापूर येथील कमांडिंग ऑफिसर कर्नल रणधीर सतीश यांनी नुकतीच भेट दिली.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एल.बी.पाटील यांनी त्यांचे स्वागत केले. महाविद्यालयातील कॅडेटसने गार्ड ऑफ ऑनर करून त्यांना मानवंदना दिली. सदरच्या भेटीमध्ये त्यांनी एनसीसी कॅडेटसशी संवाद साधला. बी आणि सी सर्टिफिकेट परीक्षेच्या संदर्भात व एनसीसी मधून मिळणाऱ्या करिअर संदर्भात मार्गदर्शन केले. अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य पाटील यांनी कॅडेटसला आपल्या अंगी असलेली शिस्त समाजातही कशी रूजवता येईल याविषयी प्रयत्न कसे करावेत. तसेच एनसीसी कॅडेटस म्हणून आपल्याकडे सकारात्मक भावना, देशाप्रती अभिमान असणे गरजेचे आहे याविषयी मार्गदर्शन केले. यावेळी विद्या विकास मंडळाचे सचिव विलासराव घुमरे, संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य मिलींद फंड, सहसचिव विक्रमसिंह सुर्यवंशी, उपप्राचार्य संभाजी किर्दाक, सुभेदार तानाजी चव्हाण व हवालदार बाळासाहेब पठाडे, एनसीसी कॅडेटस उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कॅप्टन विजया गायकवाड यांनी केले. उपस्थितांचे आभार प्रा.राम काळे यांनी मानले.

मस्कर अॅग्रो सर्व्हिसेस
व
सर्व सेवा केंद्र
मस्कर ट्रेडिंग कंपनी
आयडोल ठिबक व तुषार सिंचन, पारस गोल्ड
धानुका, तेजस्, स्वस्तिक पाईप, मर्सिबल, सबमर्सिबल पंप, मल्चींग पेपर, प्लंबींग हार्डवेअर मटेरियल व शेतीपयोगी साहित्य योग्य दरात मिळेल.
बायपास चौक, उड्डाण पुला जवळ, कमलादेवी रोड, करमाळा.
प्रोप्रा : कैलास काशिनाथ मस्कर, मो.9921325558, 9767655558

विघ्नहर्ता इंटिरीयर
प्रोप्रा : अभिषेक कमलेश देवी
मो.9028075051
करमाळा शहरातील एकमेव 'लॅमिनेट आणि हार्डवेअर' चे भव्य शोरूम
देवी प्लायवुड अॅन्ड हार्डवेअर
● प्लायवुड ● किचनट्रॉली ● वॉलपेपर
● हार्डवेअर ● फेव्हिकॉल ● वुडन फ्लोरिंग ● सनमायका
प्रोप्रा : अभिनव कमलेश देवी 9011524252
पत्ता : मेनरोड, जैन मंदिर जवळ, करमाळा., जि.सोलापूर

# करमाळा आगारासाठी नवीन बसेस उपलब्ध कराव्यात

## अभिषेक आव्हाड यांचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांना निवेदन



करमाळा(सं.प्र.): करमाळा आगारासाठी नवीन बसेस उपलब्ध कराव्यात; अशी मागणी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अभिषेक आव्हाड यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांचेकडे लेखी निवेदनाव्दारे केली आहे.

प्रसिध्दीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे, की करमाळा तालुका हा अहमदनगर, बीड, धाराशिव, पुणे व सोलापूर जिल्ह्याच्या सीमेवर आहे. करमाळा आगारातून पंढरपूर, अक्कलकोट, शिर्डी, बार्शी, तुळजापूर अशा अनेक देवस्थानी व पुणे, मुंबई सारख्या मोठ्या शहरात तसेच तालुक्यातील लहान खेडेगावात रोज बसेस धावतात. सध्या करमाळा आगारास १०० ते १२५ बसेसची आवश्यकता असताना फक्त ६५ बसेस धावत आहेत. त्यात पण दोन-चार बसेस सोडल्या तर ९९ टक्के बसेसची दुरावस्था झाली आहे. बस करमाळा आगारातून निघाल्यावर कुठे आडरस्त्याला बंद पडेल याचा नेम नाही. काही बसेसच्या खिडक्या तुटल्या असून काहींचे दरवाजेही तुटलेले आहेत. गाडीमध्ये बसायला सीट व्यवस्थित नाहीत. यापेक्षाही भयंकर बाब म्हणजे ९९ टक्के गाडीचे इंजिनच नादुरूस्त असल्याने बसेस व्यवस्थित चालत नाहीत. त्यामुळे तालुक्यातील प्रवाशांना एसटीबस मध्ये प्रवास करताना जीव मुठीत घेऊन रोज प्रवास करावा लागतो. याबाबत आगारप्रमुखांना वेळावेळी विविध संघटनांनी निवेदन दिले, पण याकडे दुर्लक्ष केल्याने जैसे थी परिस्थिती आज देखील आहे. गेल्या दहा वर्षापासून करमाळा आगाराला एकही नवीन बस देण्यात आलेली नाही. त्यामुळे याबाबीची दखल घेऊन करमाळा आगारासाठी नवीन बसेस उपलब्ध करून द्यावात. तसेच ई-बसेसची सुविधा तालुकास्तरावर देण्यात यावी व नादुरूस्त बसेसची दुरूस्ती करावी; अशी मागणी आव्हाड यांनी निवेदनात केली आहे. यावेळी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सूरज चव्हाण, जिल्हा खजिनदार राजेंद्र सुर्यवंशी, विनायक खामगळ, सनी सुर्वे उपस्थित होते.

## राष्ट्रवादी काँग्रेस तर्फे जिजाऊ जयंती साजरी



करमाळा(सं.प्र.): करमाळा तालुका राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने राजमाता जिजाऊ माँ साहेब यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी प्रतिमेचे पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले तसेच जिजाऊ माँ साहेबांचा विजय असो अशा घोषणा देण्यात आल्या.

राजमाता जिजाऊ यांचा जन्म बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेडराजा या गावी झाला. जिजाऊंच्या संस्कारात शिवाजी महाराजांचे संगोपन झाले आणि यातूनच त्यांना आपल्या दिनदुबळ्या शोषित कष्टकरी प्रजेसाठी स्वराज्य स्थापन करण्याची प्रेरणा मिळाली. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुका अध्यक्ष भरत अवताडे, जिल्हा उपाध्यक्ष आशपाक जमादार, राष्ट्रवादी युवकचे जिल्हाध्यक्ष अभिषेक आव्हाड, जिल्हा खजिनदार राजेंद्र सुर्यवंशी, कृष्णा चौधरी, सतीश पवार व कार्यकर्ते उपस्थित होते.

## २० जानेवारीला सेवानिवृत्तांसाठी तीळगुळ समारंभ

करमाळा(सं.प्र.): सेवानिवृत्त कर्मचारी संघ करमाळा चे वतीने सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांसाठी २० जानेवारीला दुपारी १ वाजता श्री स्वामी समर्थ मंदिर, फंडगल्ली, करमाळा येथे तीळगुळ समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी ग्रामसुधार समितीचे अध्यक्ष व ज्येष्ठ पत्रकार ॲड.डॉ.बाबुराव हिरडे हे उपस्थित राहणार आहेत. तरी या कार्यक्रमासाठी सर्व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी वेळेवर उपस्थित रहावे; असे आवाहन सेवानिवृत्त कर्मचारी संघाचे अध्यक्ष भागवत घाडगे व सचिव नारायण घोलप यांनी

खुशखबर मुळव्याधवर ट्रीटमेंटसाठी नको औरंगाबाद(२०८ किमी), नको मिरज (२३० किमी), आता आपल्या करमाळा (१/२ किमी) शहरात खुशखबर
डॉ.लोकरे हॉस्पिटल मध्ये सोमवार व गुरूवारी उपलब्ध
बार्शी येथील सुप्रसिध्द मुळव्याध तज्ञ
डॉ.विकास देविदास नागरगोजे (एम.एस.मुंबई)
उपलब्ध सुविधा...
● मुळव्याधवर इंजेक्शन ● डिलीव्हरीनंतर उद्भवारे कोंब ● एकदा ऑपरेशन करून पुन्हा उद्भवणारे कोंब ● संडासवाटे रक्त येणे, पु येणे ● संडासची जागा बाहेर पडणे ● संडास जागी खाज व आग होणे ● संडासाचा नागवेडा ● संडास नंतर बसण्यास त्रास होणे ● भगंदर, फिशर ● चार प्रकारचे मुळव्याध (४ प्रकारचे इंजेक्शन)
ओपीडी /ऑपरेशन ठिकाण
दर गुरूवार व सोमवार
वेळ : सकाळी ९.०० ते १२.००
लोकरे हॉस्पिटल
कृष्णाजीनगर, बायपास रोड करमाळा., जि.सोलापूर
(९८५०८५१००५)
परिचय
डॉ.विकास देविदास नागरगोजे
मुळव्याध तज्ञ
पदवी : नाशिक
पदवोत्तर : मुंबई

ओपीडीचे वैशिष्ट्ये...
● इंजेक्शन सुविधा ● लेझर सुविधा
● प्रभावी औषधी सुविधा ● मुळव्याधी आवश्यक ड्रेसिंग
● मेडिक्लेम सुविधा उपलब्ध ● पार्किंगची व्यवस्था
● आठवड्यातून दोनदा ओपीडी
विशेष सुचना... १. प्रत्येक ओपीडी दिवशी १० रूग्णांची तपासणी करण्यात येईल. २. येताना जुन्या आजाराची फाईल घेऊन येणे. ३. इंजेक्शनचा निर्णय डॉक्टरांचा राहील. ४. तपासणी अगोदर नावनोंदणी अनिवार्य. ५. परगावच्या रूग्णांनी आदल्या दिवशी फोन करावा.
नाव नोंदणीसाठी संपर्क मो.9763035862
बार्शी धन्वंतरी मुळव्याध सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल कोर्ट समोर, बार्शी.

## लोकनेते स्व.दिगंबरराव बागल शिक्षक पतसंस्था

# चेअरमन पदी विकास काळे, व्हा.चेअरमन पदी जयंत देशमुख



करमाळा(सं.प्र.) : लोकनेते स्व.दिगंबरराव बागल प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्थेच्या चेअरमन पदी विकास काळे यांची तर व्हा.चेअरमन पदी जयंत देशमुख व तज्ञ संचालक पदी भागवत गर्जे यांची निवड करण्यात आली आहे.

मावळते अध्यक्ष सतीश कांबळे यांनी पारदर्शी कारभार करून सभासदांना जास्तीत जास्त लाभांश देण्याचा प्रयत्न केला. संस्थापक/ मार्गदर्शक संचालक नानासाहेब मोहिते, जिल्हा सोसायटी संचालक हनुमंत सरडे, जुनी पेन्शनचे धनंजय दिरंगे यांचे हस्ते नूतन पदाधिकारी यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी नूतन चेअमरन विकास काळे यांनी संस्था वाढीसाठी प्रयत्न करू; असे सांगितले. यावेळी पतसंस्थेच्या सचिव पदी संतोष पोतदार यांची फेरनिवड करण्यात आली. या निवडीप्रसंगी पतसंस्थेचे संचालक शिवाजी लोकरे, सुहास कांबळे, अशोक बरडे, शशिकांत तळेकर,जयश्री माने, सुवर्णा महामुनी तसेच रंगनाथ देशमाने, सचिन बागल, अच्युत कोल्हे, नितीन रंदवे, अमोल टोणे, बाळासाहेब देशमाने, चंद्रकांत वीर, विनोदकुमार भोसले, नितीन काळे, हरिदास माने, लक्ष्मण लष्कर, विजय बाबर आदीजण उपस्थित होते.

जागा विकणे आहे
करमाळा शहरातील भवानीपेठेतील रोडटच असलेली (३८ X १६७) एकूण ६३५० स्क्वे.फूट जागा योग्य किंमत आल्यास त्वरीत विकणे आहे.
संपर्क : मो.8888400555

फ्लॅट विकणे आहे
ICICI बँकेच्या जवळ असलेला १२५० स्क्वे.फूट चा फ्लॅट फर्निचर सहीत योग्य किंमत आल्यास विकणे आहे.
संपर्क
मो.9423237685

पुनम एजन्सी
अंबुजा सिमेंटचे करमाळा तालुका वितरक
● बिल्डींग मटेरियल सप्लायर्स ● प्लंबींग ● हार्डवेअर
स्टील, सिमेंट, फरशी, ग्रेनाईट
होलसेल व रिटेल योग्य दरात मिळेल
Ambuja Cement
प्रोप्रा : प्रमोद शिंदे (9552946544) पत्ताः बायपास रोड, जेऊर.


देशभक्त
मा.उपनगराध्यक्ष
मा.नगराध्यक्ष
चेअरमन,खरेदी-विक्री संघ
आमदार
माजी आमदार
करमाळा येथील महात्मा गांधी विद्यालयाचे
माजी विद्यार्थी तसेच पोथरे जिल्हापरिषद
प्राथमिक शाळेचे सेवानिवृत्त आदर्श शिक्षक
श्री.रामचंद्र बोधे व सौ.सुलभा बोधे यांचे माजी विद्यार्थी
मा.श्री.
प्रा.राम शिंदे साहेब
यांची महाराष्ट्र राज्य विधानपरिषदेच्या सभापती पदी
निवड झाल्याबद्दल...
मा.नारायण(आबा) पाटील
मा.श्री.जयवंतराव जगताप साहेब
हार्दिक अभिनंदन
आदर्श शिक्षक
आदर्श शिक्षिका
शुभेच्छुक
बोधे परिवार
शाहुनगर, गणेशनगर
वेताळपेठ, करमाळा.
श्री.अमित बोधे सर
श्री.रामचंद्र लिंगाप्पा
बोधे गुरूजी
सौ.सुलभा रामचंद्र
बोधे मॅडम


ता.प्रमुख, शिवसेना
शिवसेना तालुका प्रमुख व युवकांचे हृदयसम्राट
मा.श्री.
सुधाकर(काका) लावंड
आपणांस वाढदिवसाच्या लाख.. लाख..
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
सुधाकर(काका) लावंड मित्र मंडळ
करमाळा तालुका

## पोफळज विविध कार्यकारी सोसायटीच्या चेअरमन पदी दत्तात्रय गव्हाणे



करमाळा(सं.प्र.): आमदार नारायण पाटील समर्थक व पोफळजचे माजी सरपंच दत्तात्रय आबा गव्हाणे यांची पोफळज विविध कार्यकारी सोसायटीच्या चेअरमन पदी बिनविरोध निवड करण्यात आली आहे. या निवडीनंतर गव्हाणे यांचा सत्कार जेऊरचे लोकनियुक्त सरपंच पृथ्वीराज पाटील, पाटील गटाचे मार्गदर्शक व भारत शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव अर्जुनराव सरक यांचे हस्ते करण्यात आला. यावेळी आमदार पाटील यांचे बंधू राजू आण्णा पाटील, रामेश्वर तळेकर, महेंद्र पाटील, धनंजय घोरपडे, दिपक राख आदी उपस्थित होते.

## उंदरगाव येथे ग्रामस्वच्छता सप्ताह - विविध क्षेत्रातील अधिकारी व प्रबोधनकार यांची मांदियाळी

करमाळा(सं.प्र.) : यशवंतराव चव्हाण महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या राष्ट्रीय सेवा योजना स्तर दोन यांच्या माध्यमातून युवकांचा ध्यास – ग्राम व शहर विकास.. हे ब्रीद घेऊन उंदरगाव येथे गावातील स्वच्छता, शोषखड्डे करण्याचा उपक्रम होती घेतला आहे. ग्रामपंचायतीने ग्रामस्वच्छता मोहिमेची जोरदार तयारी केली असून या सप्ताहमध्ये कृषी विषयक, ग्रामविकास, अंधश्रध्दा, ग्रामीण लोककला, भारूड या प्रबोधनात्मक कार्यक्रमांची मेजवाणी मिळणार आहे. महिलांसाठी हळदी–कुंकूवाचा कार्यक्रम, गावातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या भुमिपुत्रांचा सन्मान सोहळा संपन्न होणार आहे. डॉ.कोमल शिर्के व टीम आरोग्य तपासणी करणार असून डॉ.मनिष यादव व टीम पशुधन लसीकरण करणार आहे. हा कार्यक्रम १८ ते २४ जानेवारी या कालावधीत संपन्न होणार आहे.

या कार्यक्रमासाठी जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदिप जंगम, पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी, म.राज्याचे शिक्षण सहसचिव मिनाक्षी राऊत, शिक्षण मंडळाच्या विभागीय अध्यक्षा मंजुषा मिस्कर, शिक्षण उपसंचालक पुणे हारूण आतार, सहाय्यक शिक्षण संचालक डॉ.ज्योती परिहार, म्हसवडचे प्रा.प्रकाश निंबाळकर, विभागीय समन्वयक रा.से.यो. चे पोपटराव सांबरे, उपविभागीय पोलीस अधिकारी अजित पाटील, तहसीलदार शिल्पा ठोकडे, पोलीस निरीक्षक विनोद घुगे, गटविकास अधिकारी डॉ.अजित कदम, गटशिक्षणाधिकारी जयंत नलवडे, कृषी अधिकारी देवराव चव्हाण, पाणी फाउंडेशनचे समन्वयक आशिष लाड, प्रतिक गुरव इ. अधिकारी सदीच्छा भेट देणार आहेत.

या कार्यक्रमाचे उद्घाटन विद्या विकास मंडळाचे सचिव विलासराव घुमरे यांचे हस्ते १८ जानेवारीला झाले. यावेळी प्राचार्य डॉ.एल.बी.पाटील, संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य मिलींद फंड, सहसचिव विक्रमसिंह सुर्यवंशी, मुख्याध्यापक रमेश यादव, रामहरी ढेरे, अशोक भोसले, तलाठी शंभु कन्हेरी, कृषी सहाय्यक सागर होळकर उपस्थित राहणार आहेत.

या सप्ताहमध्ये स्मार्ट व्हिलेज संकल्पनेतून प्रा.डॉ.सुधीर इंगळे यांचे व्याख्यान तर डोळे असून आंधळे कसे.. या विषयावर दत्तात्रय येडवे व संजय बिदरकर यांचे व्याख्यान होईल. केळी पिकावर विनोद देशमुख तर ग्रामीण विकासात युवकांचे योगदान या विषयावर डॉ.सतीश देसाई व मी गाडगे महाराज बोलतोय.. या विषयावर समाजसुधारक फुलचंद नागटिळक यांचे व्याख्यान होणार आहे. उपप्राचार्य डॉ.अनिल साळुंखे, संभाजी किर्दाक, राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक प्रा.लक्ष्मण राख, प्रा.आर.जी.श्रीरामे, प्रा.एस.एम.पाटील, प्रा.सुजाता भोरे, प्रा.एम.बी.धिंदळे, प्रा.गजेंद्र रोकडे , ग्रामसेवक यशवंत कुदळे, सरपंच युवराज मगर, उपसरपंच शिवाजी कोकरे व ग्रामपंचायत कर्मचारी सागर कुंभार हे परिश्रम घेत आहेत. सात दिवसाच्या कालावधी मध्ये विद्यार्थी व विद्यार्थीनींची राहण्याची व जेवणाची उत्तम सोय ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आली असून ग्रामस्वच्छता कामासाठी गावातील युवक वर्ग, महिला व नागरीक सहभागी होणार आहेत.








करमाळा मतदार संघातील प्रलंबित विकासकामे मार्गी लावण्यासाठी मकरसंक्रांत सणाच्या शुभमुहूर्तावर करमाळा तालुका राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांनी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांची भेट घेतली. तसेच कमलादेवीची प्रतिमा पवार यांना भेट दिली. तसेच उपमुख्यमंत्री अजित पवार यांना विकासकामा संदर्भात निवेदन देण्यात आले.

## नामसाधना प्राथमिक विद्या मंदिरच्या वतीने आनंद बाजार उपक्रम

करमाळा(सं.प्र.): लहान वयातच मुलांना व्यावहरिक ज्ञानाची माहिती प्राप्त व्हावी; या उद्देशाने नामसाधना प्राथमिक विद्या मंदिराच्या वतीने आनंद बाजारचे आयोजन करण्यात आले होते. या बाजार मध्ये तब्बल ६० हजार रूपयांची उलाढाल झाली. नामसाधना विद्या मंदिर मधील विद्यार्थ्यांनी खाद्य पदार्थ, भाजीपाला इ. विविध प्रकारचे स्टॉल लावले होते. या बाजारला शहरातील मान्यवरांनी भेटी दिल्या. वस्तू खरेदी करण्यासाठी महिलांनी व पालकांनी मोठी खरेदी केली होती. प्रशासन अधिकारी अनिल बनसोडे, केद्रसमन्वयक दयानंद चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली हा बाजार भरविण्यात आला. या उपक्रमाचे उद्घाटन शाळेचे माजी विद्यार्थी



यशवंत लावंड यांचे हस्ते झाले. यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे सर्व सदस्य, माता–पालक संघाचे सदस्य उपस्थित होते.

हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापिका सुनंदा जाधव व सर्व शिक्षक यांनी परिश्रम घेतले.




# हेमा विद्वत यांचे शैक्षणिक कार्य इतरांसाठी प्रेरणादायी : संतोष कुलकर्णी



करमाळा(सं.प्र.): नम्रता, गुणवत्ता, विद्वत्ता याचा तिहेरी संगम म्हणजेच मुख्याध्यापिका हेमा विद्वत असून त्यांच्या आदर्श इतरांसाठी प्रेरणादायी आहे; असे प्रतिपादन भाजपा उद्योग आघाडीचे अध्यक्ष संतोष कुलकर्णी यांनी केले.

वरकुटे शाळेच्या मुख्याध्यापिका हेमा विद्वत यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त आयोजित कार्यक्रमात श्री.कुलकर्णी बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी यशकल्याणी सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष गणेश करे-पाटील हे होते.

पुढे बोलताना श्री.कुलकर्णी म्हणाले, की विद्वत मॅडम यांनी एक आदर्श शिक्षिकेच्या भुमिकेतून गोरगरीब मुलांना मार्गदर्शन करून त्यांना यशस्वी करण्याचे काम त्यांनी केले आहे. त्यांनी ज्या ज्या ठिकाणी सेवा केली, त्या ठिकाणी पालक व ग्रामस्थांमध्ये जिव्हाळ्याचे संबंध निर्माण केले तसेच गावामध्ये एकोपा निर्माण करून शाळेच्या प्रगतीमध्ये मोलाचे योगदान दिले आहे. पालकांना आपल्या मुलांच्या भविष्याबाबत कायम जागरूक ठेवण्याचेही काम केले. त्यांनी वेळप्रसंगी स्वत: काही मुलांच्या फिस भरून त्यांना सहकार्य केले आहे. विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेबरोबरच वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये कलागुणांना वाव देण्याचे काम व शाळेची गुणवत्ता कायम टिकविण्यासाठीही विद्वत मॅडम यांनी प्रयत्न केले. हे सर्व करत असताना समाजातील असणाऱ्या वेगवेगळ्या संवेदना कवितेच्या रूपातून समोर आणण्याचा प्रयत्नही विद्वत मॅडम यांनी केला. अशा सर्वगुणसंपन्न विद्वत मॅडम यांचे शैक्षणिक कार्य इतरांसाठी प्रेरणादायी आहे.

यावेळी समितीचे माजी अध्यक्ष सचिन गात, केंद्रप्रमुख दामाजी श्रीरामे, प्रसाद विद्वत, चंद्रहास चोरमले, अश्विनी विद्वत यांनी मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमास दिव्यांग संघटना सोलापूरचे अध्यक्ष विजय कुलकर्णी, सरपंच प्रतिनिधी दादा भांडवलकर, केंद्रप्रमुख रामेश्वर लोंढे, शहिद जवान नवनाथ गात स्मारक समितीचे सचिव निलकंठ ताकमोगे, माजी मुख्याध्यापक दत्तात्रय दास, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष गणेश जगताप, सरस्वती विद्यालयाचे मुख्याध्यापक अनंत जाधव, केंद्रातील मुख्याध्यापक अरविंद पाटील, शिवाजी फरतडे यांचेसह सेवानिवृत्त पोलीस निरीक्षक देवराव सुकळे, पोस्टमास्तर हरीकाका विद्वत, उद्योजक संतोष कुलकर्णी व ग्रामस्थ उपस्थित होते. सुत्रसंचालन संभाजी गोसावी यांनी केले तर प्रास्ताविक मुख्याध्यापक दत्तात्रय बेडकुते यांनी केले.

# दर महिन्याच्या तिसऱ्या रविवारी अल्पदरात मोतीबिंदू व शस्त्रक्रिया शिबीर

करमाळा(सं.प्र.) : श्री कमलादेवी ऑप्टिकल करमाळा व आनंदऋषीजी नेत्रालय अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने दर महिन्याच्या तिसऱ्या रविवारी मोतीबिंदू ऑपरेशन शिबीर घेतले जाते. विना टाका लेन्स शस्त्रक्रिया, रूग्णांना ये-जा करण्याची सोय व राहण्याची सोय केली जाते. मोतीबिंदू ऑपरेशन लेन्स सहीत खर्च २२०० रू. आहे. आजपर्यंत करमाळा तालुक्यात सहा हजार पेक्षा जास्त रूग्णांनी या शिबीराचा लाभ घेतलेला आहे. तसेच डोळ्यावरील वाढलेल्या मासाचे ऑपरेशन ६००० रू. मध्ये कॅप बसवून केले जाते. तसेच रूग्णांच्या नजर अचुकतेसाठी अतिदक्षता घेतली जाते. हे शिबीर दर महिन्याच्या तिसऱ्या रविवारी छत्रपती चौक, भवानीनाका, करमाळा येथे आयोजित केले जात असून याचा लाभ रूग्णांनी घ्यावा




स्वाभिमानी शिक्षक व कर्मचारी महासंघ, म.राज्य यांचे वतीने देण्यात येणारा राज्यस्तरीय क्रांतिसुर्य महात्मा ज्योतिबा फुले **'आदर्श गुणवंत शिक्षक'** पुरस्कार पंढरपूर येथील मातोश्री सखुबाई कन्या प्रशालेचे सहशिक्षक व रावगाव येथील रहिवाशी असलेले

**श्री. किशोर गणपत बुधवंत (सर)**

यांना मिळाल्याबद्दल...

**हार्दिक अभिनंदन !**



शुभेच्छुक

- गणपत गोविंद बुधवंत गुरूजी
- दादासाहेब जाधव (माजी सरपंच)
- एजाज अंगारशा, जाकीर शेख
- मित्र परिवार रावगाव, ता.करमाळा


# उत्तरेश्वर देवस्थानास प्रतिभा दिक्षीत यांचेकडून एक लाखाची देणगी




करमाळा(सं.प्र.): केम येथील ग्रामदैवत श्री उत्तरेश्वर देवस्थान अन्नछत्रास कै.दत्तात्रय भागवत पोतदार यांच्या स्मरणार्थ त्यांच्या कन्या प्रतिभा मोहन दिक्षीत यांचेकडून कायमस्वरूपी ठेव म्हणून ५१ हजार रूपये व मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी ५१ हजार रूपये अशा देणगीचा धनादेश मंदिर कमिटीकडे प्रदान करण्यात आला. यावेळी प्रतिभा दिक्षीत व त्यांचे पती मोहन दिक्षीत यांचा श्री उत्तेश्वर देवस्थानची प्रतिमा देऊन सन्मान करण्यात आला. याप्रसंगी चेअरमन दादासाहेब गोडसे, सचिव मनोज सोलापूरे, सदस्य विजय तळेकर, अरूण वासकर, सरपंच आकाश भोसले, पत्रकार संजय जाधव, पोस्टमन प्रशांत वेदपाठक उपस्थित होते.

**सा.कमलाभवानी संदेश वार्षिक वर्गणी २०० रू. भरून वर्षभर घरपोच अंक मिळवा..!**


शुध्द.. स्वच्छ..स्वादिष्ट नी रूचकर..!

**चिवटे उपहारगृह**



| साऊथ इंडियन | नाष्टा | स्नॅक्स | चाट | स्विट | नमकिन |
|---|---|---|---|---|---|
| इडली सांबर<br>उडीदवडा सांबर<br>उत्तप्पा<br>डोसा | पुरी भाजी<br>मिसळ पाव<br>पोहे/उपमा<br>दहीवडा/शिरा | पावभाजी<br>तवापुलाव<br>सँडविच<br>फिंगर चिप्स | पाणीपुरी<br>स्पे.भेळ<br>रगडा पॅटिस<br>राज कचोरी | पेढा, बर्फी<br>लाडू, जामून<br>मैसूरपाक<br>काजू कतली | फरसान<br>शेव<br>स्पे.चिवडा<br>पापडी |

डेअरी: दही, दुध, खवा, पनीर, बासुंदी, लस्सी

साऊथ इंडियन, नमकिन, नाष्टा, स्वीट, चाट, डेअरी, उपवास पदार्थ मिळतील.

एकवेळ अवश्य भेट द्या..!

राशिनपेठ, करमाळा. मो.८८८८१४७००५

कोल्ड्रींक: कोल्डकॉफी, ज्युस, मिल्कशेक, आईस्क्रीम

**श्री गजानन अगरबत्ती**



- सुगंधी अगरबत्ती • कापूर
- अत्तर • धूप • भीमसेन कापूर,
- विविध कलरची रांगोळी
- सर्व प्रकारचे लोबन,
- सर्व प्रकारचे पुजेचे साहित्य

योग्य दरात मिळेल !

पत्ता : वेताळपेठ, करमाळा., जि.सोलापूर

(प्रोप्रा : निखिल प्रदीप ढाळे, मो.8007255456)

### राष्ट्रवादी काँग्रेस संजयमामा शिंदे गट

## आगामी निवडणूका स्वबळावर लढवणार : ॲड.शिवराज जगताप



करमाळा(सं.प्र.) : आगामी होणाऱ्या नगरपालिका, पंचायत समिती, जिल्हापरिषद स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका व आदिनाथ कारखाना या सर्व निवडणुका राष्ट्रवादी काँग्रेस संजयमामा शिंदे गट स्वबळावर लढवणार असल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा कार्याध्यक्ष ॲड.शिवराज जगताप यांनी दिली.

प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकात ॲड.जगताप यांनी म्हटले आहे, की नुकतच्या विधानसभा निवडणुका पार पडल्या. लवकर स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीचा बिगुल वाजणार आहे. यावेळी विधानसभेचे निर्णायक मतदान पाहता करमाळा तालुक्यातील नागरीकांनी संजयमामा शिंदे यांना अपक्ष असताना देखील निर्णायक आघाडी दिलेली आहे. यातूनच असे कळते की, होणाऱ्या जिल्हा परिषद, पंचायत समिती गण गटामध्ये निश्चितच संजयमामा शिंदे यांना मानणारा मोठा वर्ग असल्यामुळे पंचायत समिती, जिल्हा परिषदेला बहुमत मिळवण्यासाठी निश्चितच जनता संजयमामा शिंदे यांच्या पाठीशी उभा राहील. तसेच विकासकामाच्या बाबतीत बोलायचे झाल्यास राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार व राज्यातील सत्ता केंद्रातील सत्ता यामुळे नगरपालिका असो पंचायत समिती, जिल्हा परिषद यामध्ये मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून विकासकामे केवळ संजयमामाच करू शकतात. तालुक्यातील जनतेला आता विकास कामे होणे महत्वाचे आहे. यामुळे नगरपालिका असो वा जिल्हापरिषद पंचायत समिती निवडणुकीमध्ये जनता निश्चितपणे संजयमामा यांच्या पाठीशी उभा राहील. त्यामुळे आगामी निवडणूक संजयमामा शिंदे गट स्वबळावर लढणार असून त्यामध्ये निश्चितच विजय मिळवणार आहे; असेही ॲड.जगताप यांनी म्हटले आहे.

## धनुर्विद्या स्पर्धेत महाराष्ट्र संघाकडून जयहिंद जगताप याची चमकदार कामगिरी



करमाळा(सं.प्र.) : राजस्थान, जयपूर या ठिकाणी झालेल्या राष्ट्रीय सब ज्युनियर धनुर्विद्या स्पर्धेत महाराष्ट्र संघाला सांघिक सुवर्णपदक प्राप्त झाले आहे. या महाराष्ट्र संघामध्ये जयहिंद जगताप (रा.वरकुटे) याने चमकदार अशी सांघिक कामगिरी करत इंडियन धनुर्विद्या या राष्ट्रीय स्पर्धेमध्ये सुवर्णपदक प्राप्त करून महाराष्ट्राचे नाव देशाच्या कानाकोपऱ्यात पोहोचवले. तो सध्या इ.९ वीच्या वर्गात गुरूकुल माध्यमिक विद्यालय करमाळा या ठिकाणी शिक्षण घेत आहे. तो करमाळा येथील सह्याद्री आर्चरी अकॅडमी येथे प्रशिक्षक सागर सावंत सर यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करत आहे. शिवाय हे त्याचे सलग दुसरे राष्ट्रीय पदक आहे.

या यशाबद्दल त्याचे करमाळा तालुक्यातून सर्व स्तरातून कौतूक होत आहे.

आयेशा
ड्रेस मटेरियल & हिजाब सेंटर
चांगल्या क्वालिटीचे
• ड्रेस मटेरियल
• बुरखा
• मकणी व नकाप
मिळण्याचे एकमेव ठिकाण !
टीप : लग्न समारंभासाठी लागणाऱ्या काचेच्या बांगड्याची ऑर्डर स्विकारली जाईल.
अत्यंत रूचकर व चवीष्ठ जेवणाचा
घरगुती डबा मिळेल
• १ डबा : ६० रू.
• दररोज १ डबा : १५०० रू.(महिना)
• दररोज २ वेळ डबा : २५०० रू.(महिना)
पत्ता : कानाडगल्ली, पेट्रोलपंपाशेजारी, करमाळा. परवीन तांबोळी (9699859227)

## संत निरंकारी सत्संगामध्ये विधवांनाही दिला कुंकूवाचा मान



करमाळा(सं.प्र.) : संत निरंकारी सत्संग भवन, करमाळा येथे मकरसंक्रांती निमित्त महिला सत्संगाचे आयोजन करण्यात आले होते. समाजात मकरसंक्रांतीच्या सणाला विधवांना कुंकूवाचा मान दिला जात नाही. त्यांना सहभागी करून घेतले जात नाही. अवमानकारक प्रसंगही अनुभवावे लागतात. म्हणून संत निरंकारी महिला सत्संग सोहळा संपन्न झाल्यानंतर प्रथमत: सर्व सौभाग्यवतींनी विधवांना सन्मानपूर्वक कुंकवाचा मान देवून गौरविण्यात आले. एकत्वाच्या संस्कारातून नारी शक्तीचे सक्षमीकरण करण्यासाठी अध्यात्मिक जागृती आवश्यक असते; असे प्रतिपादन सुजाता ढवळे यांनी केले. या कार्यक्रमात साधनाताई खताळ, रतन राऊत, मिनाक्षी थोरबोले, जगदेवी शिंदे यांना प्रथमत: कुंकूवाचा मान देवून हळदी-कुंकूवाने सन्मानित करण्यात आले. तद्नंतर सर्व महिलांमध्ये हळदी-कुंकूवाचा कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रफुल्लता थोरात यांनी केले. उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.



स्वाभिमानी शिक्षक व कर्मचारी महासंघ, म.राज्य यांचे वतीने देण्यात येणारा राज्यस्तरीय क्रांतिसुर्य महात्मा ज्योतिबा फुले **'आदर्श गुणवंत शिक्षक'** पुरस्कार पंढरपूर येथील मातोश्री सखुबाई कन्या प्रशालेचे सहशिक्षक व रावगाव येथील रहिवाशी असलेले किशोर गणपत बुधवंत यांना मिळाला आहे. तो पुरस्कार स्वीकारताना बुधवंत सर व मान्यवर

लखमीचंद क्लॉथ स्टोअर्स
होलसेल साडी डेपो व लेडीज, किड्स वेअर
प्रिंटेड साडी, कांजीवरम् साडी, काटपदर साडी
कॉटन साडी, पार्टीवेअर साडी,लेडीज टॉप व कुर्ती,
लेगीज, किड्स वेअर योग्य दरात मिळतील.
टीप : आहेराच्या साड्या व इतर साड्या होलसेल दरात मिळतील.
मकरसंक्रांती निमित्त
पैठणी साड्यांचा भरपूर स्टॉक उपलब्ध
पत्ता : छत्रपती शिवाजी महाराज पुतळयाजवळ, भवानीपेठ, करमाळा.(९१७२०९२१८७)

महाराष्ट्रात प्रथमच...
गाडी,युपीएस इन्व्हर्टरसाठी नविन बॅटरी घेताय ?
बॅटरी बदलण्यापूर्वी तुमच्या जुन्या बॅटरीची तपासणी करा
आणि बॅटरी बदलण्याच्या त्रासापासून चिंतामूक्त व्हा...
आता जून्या बॅटरी चालतील नव्यासारख्या !
२ चाकी | ३ चाकी | ४ चाकी | ट्रक | ट्रॅक्टर | JCB | पोक्लेन | सोलर
एकाच छताखाली सर्व प्रकारच्या सोलर इन्व्हर्टर बॅटरी सर्व्हिसेस
सुभद्रा पॉवर सोल्युशन्स
प्रोप्रा. श्री. स्वप्निल आदिनाथ आदलिंगे (ME Industrial Automation) 9172927337
श्री.आदिनाथ जयवंत आदलिंगे (मा.विस्तार अधिकारी, पंचायत समिती, करमाळा) 7588506719
शाखा नं.१ त्रिमुर्ती कुशन्स् शेजारी पुणे रोड,करमाळा / शाखा नं.२: मातोश्री कॉम्प्लेक्स, IDBI बँकेच्या पाठीमागे, श्रीदेवीचामाळ रोड, भवानी नाका, करमाळा.

# गाळे भाड्याने देणे आहे

संगोबा रोडवरील चांदगुडे प्लॉट मधील रोडटच असलेले आदिनाथ महाराज कॉम्प्लेक्स मधील गाळे भाड्याने देणे आहे

संपर्क : 9552997035, 9657874179, 9822921962


राजमाता जिजाऊ जयंतीनिमित्त

## कुंभेज येथे शिवस्फुर्ती समुहाच्या वतीने विधायक उपक्रम



करमाळा(सं.प्र.) : राजमाता जिजाऊ जयंतीनिमित्त कुंभेज येथील शिवस्फुर्ती समुहाच्या वतीने विविध विधायक उपक्रम राबविण्यात आले. यामध्ये रक्तदान शिबीर हा उपक्रम राबविण्यात आला. या शिबीराचे उद्घाटन शहिद जवान वीर पत्नी राणीताई काटे यांचे हस्ते झाले. यावेळी माजी सैनिकांची उपस्थिती होती. या शिबीरात १०२ रक्तदात्यांनी रक्तदान केले. करमाळा येथील कमलाभवानी ब्लड बँकेने रक्तसंकलनाचे काम केले. पोफळज येथील श्वेता शिवाजी पवार व पल्लवी कुमार कादगे या मुलींनी जिजाऊंची वेशभूषा साकारली. उपस्थितांनी जिजाऊ वंदना करून प्रतिमा पूजन केले. ऋषीकेश भोसले यांनी दिलेली शिव गारद लक्षवेधक होती. या कार्यक्रमात मिडीयाचे पत्रकार शितलकुमार मोटे, फुटबॉल खेळात राष्ट्रीय पातळीवर सुवर्णपदक मिळवून देणारे वेदातं आप्पासाहेब काटे, पंजाब ग्रामीण बँकेत मॅनेजर पदी निवड झालेले श्रीराम भोसले यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी शिवस्फुर्ती समुहाच्या वतीने उपस्थित सर्व मान्यवरांना आणि रक्तदात्यांना जिजाऊंची शिकवण हा ग्रंथ भेट देण्यात आला. शिवस्फुर्ती समुहाचे जिल्हाध्यक्ष अनिल कादगे यांच्या पुढाकारातून व मित्रपरिवाराच्या सहकार्यातून जयंती उत्सव साजरा करण्यात आला. यावेळी श्री.पठाडे, सैनिक संघटनेचे तालुका अध्यक्ष अक्रूर शिंदे, सचिव बिभिषण कन्हेरे, सुरेश आदलिंग, सुभाष मुटके, भारत कादगे, सुनिलबापू सावंत, प्रविण भोसले, पक्षीमित्र कल्याणराव साळुंके, आदर्श शिक्षिका रेखा साळुंके, डॉ.राजेंद्र शिंदे, म.पो.नि. परमेश्वर कादगे, गणेश शिंदे, अमोल मुटके, आण्णासाहेब भोसले, उपसरपंच संजय तोरमल, विनोद कादगे, रवी काटे, ब्लड बँकेचे निलेश पाटील, भारत पवार, महावीर भोसले, संभाजी भोसले, किरण शिंदे, वैभव साळुंके, संतोष महाराज, श्रीराम शिंदे, सुदेश माने व ग्रामस्थ उपस्थित होते.

## ऊसतोड मजुर देतो म्हणून १४ लाखाची फसवणूक

करमाळा(सं.प्र.) : ऊसतोडीसाठी तुम्हाला ५४ ऊसतोड मजूर पाठवतो.. असे म्हणून १४ लाख रूपये घेऊन मजूर न पाठवता फसवणूक केली आहे. हा प्रकार ५ मे २०२४ ते १४ ऑक्टोबर २०२४ पर्यंत या कालावधीत घडला आहे. या प्रकरणी शंकर दिगंबर मारकड (रा.उमरड) यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की आमच्याकडे ऊस वाहतुकीसाठी दोन ट्रॅक्टर व चार ट्रॉल्या आहेत. ऊसतोडीसाठी आम्हाला २७ कोयते पाहिजे होते, ते कोयते देतो असे म्हणून जयसिंग राजेसिंग माळचे (रा.वासदरे, ता.जि.नंदूरबार) यांनी वेळोवेळी १४ लाख रूपये मजूरांना द्यायचेत म्हणून घेतले. परंतु त्याने मजूर न देता फसवणूक केली आहे. यात पोलीसांनी गुन्हा दाखल केला आहे.

## हिंगणी येथे भरदिवसा १ लाख ३५ हजाराची चोरी

करमाळा (सं.प्र.) : हिंगणी येथे भरदिवसा घराचे कुलूप तोडून चोरट्यांनी घरातील सोन्याचे दागिणे व रोख रक्कम असा १ लाख ३५ हजार रूपयाचा ऐवज चोरून नेला आहे. हा प्रकार ९ जानेवारीला सकाळी १० ते सायंकाळी ६ च्या दरम्यान घडला आहे.

या प्रकरणी देवीदास नाना मोरे (रा.हिंगणी) यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की ९ जानेवारीला आम्ही सर्वजण शेतात गेल्यानंतर घराचे कुलूप तोडून चोरट्यांनी घरात प्रवेश करून रोख रक्कम ४० हजार व ९५ हजाराचे सोन्याचे दागिणे चोरट्यांनी चोरून नेले आहे. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

## उमरड येथे भरदिवसा चोरी

करमाळा(सं.प्र.) : उमरड येथे बंद घराचे कुलूप तोडून चोरट्यांनी घरात प्रवेश करून ३ लाख रूपयाची चोरी केली आहे. हा प्रकार ९ जानेवारीला सकाळी८ ते दुपारी ३ च्या दरम्यान घडला आहे. या प्रकरणी धर्मराज रामा चौधरी (रा.वलटे वस्ती, उमरड) यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की आम्ही आमच्या घराचे कुलूप लावून गावातील दवाखान्यात व किराणा दुकानात सामान आणण्यासाठी गेलो होतो. त्यानंतर चार वाजता घरी परत आलो. तेव्हा घराचे कुलूप तुटलेले दिसले व घरातील सामान अस्ताव्यस्त पडलेले दिसले. चोरट्यांनी कपाटातील रोख रक्कम १ लाख रूपये व २ लाख रूपयाचे सोन्याचे दागिणे असा एकूण ३ लाख रूपयाचा ऐवज चोरीला गेला आहे. या प्रकरणी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे

## श्रीदेवीचामाळ ग्रा.पं. सरपंच पदी वेणुबाई पवार उपसरपंच पदी सचिन शिंदे






करमाळा(सं.प्र.) : श्रीदेवीचामाळ ग्रामपंचायतीच्या सरपंच पदी माजी आमदार जयवंतराव जगताप गटाच्या वेणुबाई संतोष पवार व उपसरपंच पदी सचिन दिलीप शिंदे यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. या निवडीप्रसंगी सदस्य अमोल चव्हाण, दिपक थोरबोले, बाळासाहेब सोरटे यांचेसह अभिमान पवार, अशोक चव्हाण, ओंकार चव्हाण, गुरूदत्त भाऊसाहेब चव्हाण, सुशांत पवार,सचिन गोपाळ चव्हाण, अजय पवार, प्रतिक चव्हाण, महिंद्र अनभुले, सूरज पवार, अक्षय थोरबोले, सुमित थोरबोले, प्रमोद गायकवाड, सतीश थोरबोले, विजय चव्हाण, निखिल चव्हाण, समाधान सोरटे, दादासाहेब पुजारी, दिनेश मचाले, निलेश बिडवे, नवनाथ सोरटे, सुनील शिंदे, अनिल शिंदे, दिनेश थोरबोले, गणेश मचाले व ग्रामस्थ उपस्थित होते. निवडीनंतर नूतन सरपंच व उपसरपंच यांचा सत्कार माजी आमदार जयवंतराव जगताप यांचे हस्ते करण्यात आला. श्रीदेवीचामाळ गावच्या विकासासाठी आपण सर्वतोपरी प्रयत्न करणार असल्याचे नूतन सरपंच वेणुबाई पवार यांनी सत्काराला उत्तर देताना सांगितले.


॥ श्री कमलाभवानी प्रसन्न ॥

# सोनाली प्लाय फर्निचर



डोअर, स्लायडिंग विंडो
SS स्टील रेलिंग
तयार करून मिळेल.



● शिवाजी खाडे (९४०४२९९६९६) ● जगन्नाथ खाडे (९८५०९३०७७५)

पत्ता : गाळा नं.४७/४८, जामखेड रोड, करमाळा., जि.सोलापूर

# साई स्टील रेलिंग & किचन ट्रॉलीज्

सर्व प्रकारचे
स्टील रेलींग, मेनगेट
किचन ट्रॉलीची सर्व कामे
खात्रीशीर व वेळेवर
करून मिळतील.



प्रोप्रा : प्रशांत जोशी मो.9881028191 / 7798304502

पत्ता : सय्यद कॉम्प्लेक्स, करमाळा-नगर रोड, बायपास, करमाळा.

# आनंदऋषि नेत्रालय व्हिजन सेंटर



रेबन गॉगल, फास्ट्रॅक, लाईफस्टाईल गॉगलचे स्टॉकिस्ट डिलर
अनेक व्हारायटीसह सर्व चष्मे मिळतील.
● सर्व प्रकारचे कॉन्टॅक्ट लेंस, चष्मे, गॉगल्स विक्री व दुरूस्तीचे ठिकाण
कॉम्प्युटरव्दारे मोफत नेत्रतपासणी करून मिळेल.

मोतीबिंदू बिनटाक्याची शस्त्रक्रिया : २२०० रू. (औषध व लेन्स खर्चासह)

दर महिन्याचा तिसरा रविवारी शिबीर वेळ : सकाळी १० ते २ पर्यंत

Ray-Ban गॉगल्स चे अधिकृत विक्रेते

श्री कमलादेवी ऑप्टीकल्स नगरपालिका शॉपींग सेंटर, दत्तपेठ, करमाळा.
प्रोप्रा : चाळक फिसरेकर मो.९४२३५३५४४२

### दूध संकलन व शीतकरण केंद्र चालकांचा स्नेहसंवाद मेळावा

## तरूणांनी स्वत:चे उद्योग उभा करावेत : आ.देशमुख



करमाळा (सं.प्र.): आण्णासाहेब आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून लोकमंगल बँकेच्या वतीने शेतकऱ्यांना व उद्योजकांना कर्जपुरवठा केला जात आहे. या कर्जदारांना कर्ज व्याजमाफीचा परतावा दिला जाणार आहे. तरूणांनी स्वत:चे उद्योग उभा करावेत; यासाठी मागेल त्याला कर्ज देण्याची आमची भुमिका आहे; असे प्रतिपादन आमदार सुभाष देशमुख यांनी केले.

लोकमंगल को.ऑप. बँक लि; सोलापूर व दूध डेअरी चेअरमन असोसिएशन करमाळा, छत्रपती दूध संकलन व शीतकरण केंद्र यांचे संयुक्त विद्यमाने आयोजित स्नेहसंवाद मेळाव्यात आमदार देशमुख बोलत होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून शिवसेनेचे जिल्हाप्रमुख महेश चिवटे, लोकविकास डेअरीचे चेअमरन दिपक देशमुख, बाजार समितीचे माजी उपसभापती दत्तात्रय अडसुळ, शिवसेना उपतालुका प्रमुख गौतम रोडे उपस्थित होते. यावेळी आमदार देशमुख यांनी मेळाव्यास उपस्थित सर्व दूध संकलन (चेअरमन) संस्था चालकांसमवेत संवाद साधला. दूध व्यावसायिकांना व्यवसाय वाढीबाबत मार्गदर्शन केले. तसेच दूध उत्पादन वाढीसाठी बँकेच्या माध्यमातून अर्थसहाय्य देऊन आर्थिक सक्षम करण्याची ग्वाही दिली. यावेळी प्रातिनिधीक स्वरूपात दूध संकलन केंद्र चालकांना बँकेच्यावतीने आण्णासाहेब पाटील महामंडळ अंतर्गत मंजूर झालेल्या कर्जाचा धनादेश वितरीत करण्यात आले. उपस्थितांचे स्वागत दूध संकलन चेअरमन संघाचे अध्यक्ष अजिंक्य पाटील यांनी केले. उपस्थितांचे आभार शिवाजी पाटील यांनी मानले. या कार्यक्रमास लोकमंगल बँकेचे व पतसंस्थेचे अधिकारी, कर्मचारी तसेच करमाळा तालुक्यातील दूध संकलन केंद्र चालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.


**बंगला विकणे आहे**

मथुरानगर मधील
**2 BHK बंगला** योग्य
किंमत आल्यास विकणे आहे.
संपर्क
मो.9689557710
मो.9423237685

**कामगार पाहिजे**

आमच्या पेट्रोलपंपावर पेट्रोल देण्यासाठी तसेच अकौटींगचे काम करण्यासाठी कामगाराची आवश्यकता आहे. गरजूंनी संपर्क करावा
संपर्क
**श्रीरंग पेट्रोलियम**
नगररोड, करमाळा., जि.सोलापूर
मो.नं.9334506584

**कामगार पाहिजे**

ऑफिस कामासाठी
**मुलगी/मुलगा पाहिजे**
शिक्षण : बारावी ते पदवीधर (संगणकाचे ज्ञान आवश्यक)
अपेक्षित पगार मिळेल. कामाची वेळ : सकाळी ९ ते १
संपर्क
मो.7709003355, 9423237685

**घोलप हार्डवेअर**
कृषी संदर्भातील सर्व साहित्य मिळेल.
• प्लंबिंग मटेरियल
• नट बोल्ट
• मग • झाडू • टब
• कॅरेट • ताडपत्री
• नायलॉन दोर
• प्लास्टीक कागद
संपर्क : मो.9922111204
पत्ता : रिलायन्स पेट्रोलपंपासमोर, बायपास रोड, शाहुनगर, करमाळा.


## बसस्टॅन्ड मधील कामात खडी ऐवजी मुरमाचा वापर

### शिवसेना जिल्हाप्रमुख महेश चिवटे यांची तक्रार

करमाळा(सं.प्र.): करमाळा बसस्थानकातील काँक्रीटीकरण करण्यासाठी दोन कोटी रुपये मंजूर केले होते. अंदाजपत्रकाप्रमाणे खडी न वापरता माती मिश्रित मुरूम वापरत असल्यामुळे रस्त्याचे काम निकृष्ट होत आहे. त्याची चौकशी करावी; अशी मागणी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख महेश चिवटे यांनी एसटी महामंडळाचे बांधकाम विभागाचे अधिकारी चौधरी यांचेकडे लेखी निवेदनाव्दारे केली आहे.

शिवसेनेचे जिल्हाप्रमुख महेश चिवटे यांनी बसस्थानकात जावून रस्त्याच्या कामाची पाहणी केली. गेली २५ वर्षानंतर करमाळ्याच्या बस स्थानकाला रस्त्यासाठी पैसे मंजूर झाले आहेत. हे काम निकृष्ट दर्जाचे झालेतर पुन्हा २० वर्षे काम होणार नाही. एसटी महामंडळाचे बांधकाम विभाग याकडे कुठलेही लक्ष देत नाही.


करमाळा बसस्थानकातील पेट्रोल पंपासमोर ४७ लाख रूपये सिमेंट रस्त्यासाठी मंजूर केले आहेत. पावसाळ्यात एसटी स्टॅन्ड मध्ये सर्वत्र पाणी साठल्यामुळे प्रवाशांची कुचंबना होते. सध्या करमाळा बसस्थानकातील काँक्रीटीकरणाचे काम सुरू असून यामध्ये खडी न वापरता माती मिश्रीत मुरूम वापरल्या जात आहे. त्यामुळे सदरचे काम निकृष्ट दर्जाचे होत आहे. तरी याबाबीकडे आगारप्रमुखांनी तातडीने लक्ष देऊन सदरचे काम उच्चप्रतीचे करण्यासाठी प्रयत्न करावेत; अशीही मागणी चिवटे यांनी केली आहे.


**श्वेता गिफ्ट & टॉईज**
2025 या नवीन वर्षात
मकरसंक्रांतीनिमित्त
विशेष डिस्काऊंट ऑफर
आपल्या लाडक्या मुला-मुलींच्या वाढदिवसानिमित्त
आकर्षक रिमोट कंट्रोल इलेक्ट्रीक थार (जीप) भेट द्या !
पत्ता : श्रीराम मंदिर शेजारी, वेताळपेठ, करमाळा.
(9822058106, 7798307085)

प्रवेश... श्री गिरधरदास देवी प्रतिष्ठान संचलित प्रवेश..

# नवभारत इंग्लिश मेडियम स्कूल & ट्विंकलिंग स्टार्स

पुणे रोड, करमाळा., जि.सोलापूर



**आमच्या शाळेची वैशिष्ट्ये...** माफक फी

- २५ वर्षाचा अनुभवी शिक्षकवर्ग
- विषयांमध्ये पारंगत शिक्षक वर्ग
- खेळण्यासहीत मोठे क्रिडांगण
- ऑलंपियाड, मंथन, ए.टी.एस., आय.ए.एस., स्कॉरलशीप परीक्षेत मेडल मिळवणारा विद्यार्थीगण
- कंप्युटर लॅब, सायन्स लॅब, मॅथस् लॅब
- विद्यार्थ्यांकडे वैयक्तीक लक्ष
- विद्यार्थ्यांसाठी सुरक्षित वातावरण

## Nursery to 10th
## वर्गासाठी प्रवेश देणे चालू



**मर्यादित जागा..** आजच आपल्या पाल्याचा प्रवेश निश्चित करा..!




**Mob No.7741907285, 9960522370**

श्री गिरधरदास देवी प्रतिष्ठान संचलित **नवभारत इंग्लीश स्कुलचे नाव रोशन !**
**प्रथमेश जितेंद्र क्षीरसागर याची मर्चंट नेव्ही (ब्राझील, साऊथ अमेरिका) येथे** नियुक्ती झाली आहे. आम्हाला तुझा सार्थ अभिनान आहे प्रथमेश..!

मी नवभारत इंग्लिश स्कुलचा सन २०१९-२० च्या बॅचचा विद्यार्थी होतो. शाळेमध्ये माझा शैक्षणिक पाया पक्का झाला की मी इ.११ वी व इ.१२ वी सीबीएससी मध्ये चांगले गुण मिळवू शकलो. त्यानंतर मर्चंट नेव्हीसाठी चेन्नई मध्ये माझे सिलेक्शन झाले आणि आता ब्राझील मधून जॉईन होणार आहे. नवभारत स्कुल मध्ये इतर विषयांबरोबर गणित व सायन्सचा सराव घेतला जातो. शाळेमध्ये घेतलेल्या इंग्लीश ग्रामरचाही खूप उपयोग झाला. त्याबद्दल मी सौ.सुनिता देवी मॅडम यांचा खूप.. खूप.. आभारी आहे. तसेच नर्सरी ते दहावी पर्यंत ज्या शिक्षकांनी मला चांगले शिक्षण दिले त्यामुळे मी या पदासाठी पात्र ठरलो..! त्यांचेही मी आभार मानतो..!

**संचालक :** श्री कन्हैयालाल देवी, श्री.अमोद संचेती, श्री.चंद्रकांत देवी, श्री.विजयकुमार दोशी, सौ.सुनिता कन्हैयालाल देवी
**मुख्याध्यापिका व सर्व शिक्षक वृंद**

---

सुखावणाऱ्या थंडीत **'हुरड्याची रंगत'**, गावरान मेजवानीनं **'सजेल पंगत'!**

• कालावधी •
दि.१९ जानेवारी ते ३१ जानेवारी २०२५
• वेळ •
सकाळी ११.०० ते सायं ६.०० पर्यंत



# हुरडा महोत्सव

करमाळा शहरापासून
**३ किमी अंतरावर** (करमाळा-अहमदनगर महामार्गावर MIDC च्या पुढे ५०० मीटर अंतरावर)

## गुळभेंडी हुरडा
विविध प्रकारची चटणी, फरसाण, रेवडी, गोडीशेव



अस्सल
## गावरान जेवण
चुलीवरील भाकरी, बेसन, ठेचा, पापड, लोणचे



**लहान मुलांसाठी खेळणी**








- प्रौढ : ३५० रू. प्रत्येकी
- मुले : २०० रू. प्रत्येकी (१२ वर्षे आतील)

## ऊसाचा रस
ऊस, विविध प्रकारचे फळे



* आयोजक *
**संदेश परिवार**
करमाळा., जि.सोलापूर

ॲडव्हान्स बुकींग आवश्यक

बुकींगसाठी संपर्क...
**मो.7798307085**